सकाळ



कोल्हापूर : प्रा.डॉ. चंद्रकांत लोखंडे यांचा सत्कार करताना कुलपती डॉ. संजय पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा.

# डी.वाय.पाटील विद्यापीठातर्फे डॉ. चंद्रकांत लोखंडे यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. २ : भारतातून ज्या शास्त्रज्ञांच्या संशोधनाचा क्रमांक पहिल्या दोन टक्क्यांत लागतो, त्यांची यादी प्रसिद्ध झाली. यादीत अप्लाईड फिजिक्स विषयातून भारतातील नावाजलेल्या संस्थांमधून ७७ शास्त्रज्ञांची निवड झाली आहे, कोल्हापुरातील डी. वाय. पाटील विद्यापीठाचे संशोधक संचालक प्रा. डॉ. चंद्रकांत लोखंडे यांना यादीत देशात प्रथम स्थान दिले आहे. या निवडीबद्दल प्रा. लोखंडे यांचा डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला.

कुलपती डॉ. पाटील म्हणाले, 'संशोधक संचालक डॉ. लोखंडे यांच्या मानांकनामुळे डी. वाय. पाटील विद्यापीठाचाही जागतिक स्तरावर सन्मान झाला आहे.

संशोधनासाठी हे विद्यापीठ नेहमीच सर्व सुविधा पुरवण्यावर अग्रेसर आहे.' या वेळी विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, परीक्षा नियंत्रक अरुण पोवार, वित्त अधिकारी नारायणस्वामी उपस्थित होते.

## प्रा. लोखंडेंचे ५३० पेक्षा जास्त शोधनिबंध

प्रा. लोखंडे यांनी नॅनोमटेरियल्स तयार करणाऱ्या नव्या पद्धती व त्यांचा गॅस सेन्सर, सौरघट, सुपरकपॅसिटर उपकरणांसाठी वापर यावर प्रामुख्याने संशोधन केले आहे. त्यांना भारत सरकारच्या विविध संस्थांमधून निधी उपलब्ध झाला आहे. त्यांनी आतापर्यंत ५३० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झाले असून, त्यांच्या शोधनिबंधाचा संदर्भ हा २८ हजारपेक्षा जास्तवेळा घेतला आहे. त्यांनी ४५ हून जास्त पेटंटस् घेतली आहे. ५५ पेक्षा जास्त पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

# दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा सुरळीतपणे सुरु आहेत. सोमवारी ४३ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ७ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिल्या. काही तांत्रिक अपवाद वगळता परीक्षा विनाअडथळा



पार पडल्या. दरम्यान, अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राचे निकाल जाहीर करण्यासही सुरुवात झाली. सोमवारी पीजी डिप्लोमा इन ह्यूमन राईट्स, सर्टीफिकेट कोर्स इन रशियन लँग्वेज या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

पहिल्या सत्रात ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. यामध्ये एम. एस. डब्ल्यू, बी. एस. डब्ल्यू, बी. व्होक, बी.ई, एम. बी. ए, एम. एस. सी, बी. एस.सी, एम. आर. एस, लॉ या अभ्यासक्रमांच्या तर दुसऱ्या सत्रात बी. टेक, बी. फार्म, एम. बी. ए, बी. सी.ए, एम. कॉम, बी. बी. ए, बी. कॉम, एम. एससी या ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. अंतिम व तिसऱ्या सत्रात ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. यामध्ये बी. टेक्सटाईल, बी. एफ. टी. एम, बी. जे, बी. एस.सी, एम. ए, बी. ए, बी. एड, बी.पी. एड., एम. एड या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

# ४२ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध २६ अभ्यासक्रमांच्या ४२,९८९ विद्यार्थ्यांनी सोमवारी अंतिम वर्षाची परीक्षा दिली. ६९२४ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली. पी. जी. डिप्लोमा इन ह्युमन राईटस्, सर्टिफिकेट कोर्स इन रशियन लँग्वेज या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचा निकाल हा परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून जाहीर करण्यात आला. विविध अभ्यासक्रमांच्या परिक्षांसाठी एकूण ४३,५८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यार्थ्यांना परीक्षादरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकारण करण्यासाठी विद्यापीठाची यंत्रणा कार्यरत होती